# राजकीय पर्यावरण

**डॉ.सोमगोंडे एन.एस.**
राज्याशास्त्र विभाग प्रमुखजवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
अणदूर. पिन कोड - ४१३६०३. ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

---

**प्रास्ताविक :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये पर्यावरण हा घटक एक महत्वपूर्ण शक्ती म्हणून आकाराला आला आहे. पर्यावरण सरंक्षणविषयीची आंतरराष्ट्रीय चळवळ तीव्र होण्याबरोबर पर्यावरणवादी राजकीय पक्ष अनेक राष्ट्रांच्या तसेच आंतरराष्ट्रीय राजकाणामध्ये महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. पर्यावरण संरक्षणाची जाणीव वैश्विक बनली आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील संघर्षाचा पर्यावरण हा महत्वाचा मुद्दा बनला आहे. पर्यावरणाच्या प्रश्नामुळे आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा प्रश्न निर्माण झाला आहे. आजकाल राष्ट्रांनी सुरक्षेपेक्षा पर्यावरणाच्या सुरक्षेला प्राधान्य दिल्याचे दिसते. राष्ट्रामधील वाढत्या परस्परावलंबित्वाला पर्यावरणाचा घटक जाबाबदार आहे. एका राष्ट्राहून झालेल्या पर्यावरणाच्या प्रदूषणाचे परिणाम केवळ त्या राष्ट्रालाच नाही तर शेजारी राष्ट्रांना ही भोगावे लागतात. पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या आज वैश्विक बनली आहे. आज प्रत्येक राष्ट्राला पर्यावरण प्रदूषणच्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे. पर्यावरणाच्या समस्यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमान वाढले समुद्रातील पाण्याची पातळी वाढली आम्ल पर्जन्य ओझोन थराचा क्षय,हवा, पाणी आणि जमिनीच्या प्रदूषणामधून निर्माण झालेल्या समस्या आहेत. याचे हानिकारक परिणाम प्रत्येक सजीवाला भोगावे लागत आहे.

उद्दिष्टये : पर्यावरणाच्या प्रदूषणामुळे मानवी जीवनावर होणारे परीणाम जाणून घेणे.

**माहिती संकलन :-** दुय्यम साधनांच्या आधारे पर्यावरण प्रदूषणाच्या समस्या जाणून घेणे. समकालीन जागतिक राजकारणातील समस्या व इतर ग्रंथातून माहिती घेण्यात आली आहे.

**संशोधनाची व्याप्ती :** - राजकीय पर्यावरणातील निर्माण होणा-या समस्या अभ्यासणे.

**विषय प्रवेश: -** हवा,पाणी आणि जमिन हे पर्यावरणातील मुख्य घटक आहेत. हवा, पाणी आणि जमिनीमध्ये काही हानिकारक पदार्थ मिसळल्यामुळे या घटकांच्या जैविक, रासायनिक आणि भौतिक गुणधर्मामध्ये बदल घडून येतात या घटकामुळे हे घटक निरूपयोगी बनतात. त्यामुळे आरोग्यासाठी धोका निर्माण होतो. याला प्रदूषण असे म्हणतात. हवेचे प्रदूषण , पाण्याचे प्रदूषण जमिनीचे प्रदूषण असे प्रदूषणांचे प्रकार आहेत. उद्योगधंदे, कारखाने स्वयंचलित वाहने घरगुती इंधन-ज्वलन यामधून हवेचे प्रदूषण वाढते. उद्योग धंद्यामधील टाकाऊ पदार्थ, कीटकनाशके, जंतुनाशके, खनिज तेल पाण्यात
मिसळल्यामुळे जलप्रदूषण वाढते. रासायनिक खतांचा अतिवापर, सार्वजनिक कचरा, औद्योगिक कचरा इ. प्रदूषण वाढते.

**पर्यावरणाचे प्रदूषण -** वाढती लोकसंख्या, आर्थिक आणि औद्योगिक विकासाची अनित्रीत प्रक्रिया यातून पर्यावरणाचे प्रदूषण वाढते. आज जगाला वायू प्रदूषण, जलप्रदूषण , भूप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, सागरी प्रदूषण, औष्णिक प्रदूषणाचे दुष्परिणाम भोगावे लागत आहे. कारखानातून निघणारा धूर वाहने यातून हवेचे प्रदूषण वाढत आहे. कारखान्यामधील विषारी पदार्थ, तेल आणि पेट्रोलियम पदार्थ किटकनाशके, जंतू नाशके, किरणोत्सर्गी पदार्थ, नदी ओढयाच्या, समुद्राच्या पाण्यात प्रदूषण वाएत आहे. एका राष्ट्रातील पर्यावरणातील प्रदूषणाचे दुष्परिणाम दुस-या राष्ट्राला भोगावे लागत आहे. उदा. अमेरिकेतील औद्योगिकरणातून वाढत्या प्रदूषणाचे दुष्परिणाम शेजाच्या कॅनडासारख्या राष्ट्राला आम्ल पर्जन्याच्या रूपाने भोगावे लागतात. १९८६ साली सोविएत रशियाच्या युक्रेन राज्यातील चोर्नोबिल अणुभट्टीत स्फोट झाला आणि हावेत किरणोत्सर्जन झाले. याचा परीणाम केवळ युक्रेनला नाही तर इटलीपासून स्वीडिनपर्यंतच्या देशांना दीर्घकाळापर्यंत भोगावे लागले. आज पर्यावरणाचे प्रदूषण थांबविण्यासाठी अमेरिका , कॅनडा तसेच पश्चिम आणि पूर्व युरोपीयन राष्ट्रांनी आनेक करार केले आहेत.

**पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम : -**

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

१) **वैश्विक तापमान वाढ :** - पर्यावरण प्रदूषणाचा सर्वात भयंकर परिणाम म्हणून वैश्विक तापमानाकडे बघितले जात आहे. औद्योगिक क्रांतीनंतर युरोपियन राष्ट्रांनी आर्थिक विकास करताना पर्यावरण संरक्षणाकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष्य केले. पृथ्वीचे तापमान वाढवणा-या कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन, नायट्रस ऑक्साईड, हायड्रो फ्लोरोकार्बन सल्फर, हेक्सा फ्लोराईड यासारखे पृथ्वीचे तापमान वाढविणारे वायू हावेत मिसळले गेले. पर्यावरण तज्ञांच्या मते स.न. २०५० पर्यंत पृथ्वीचे तापमान दाने अंश ते अकरा अंश सेल्सिअसमध्ये वाढण्याची शक्यता आहे.

२) **आम्लपर्जन्य :**

आम्ल पर्जन्य ही वायू प्रदूषणातून निर्माण होणारी समस्या आहे. गंधक आणि नायट्रोजन ऑक्साइड्स धूर इंधनाचे ज्वलन, पॉवर प्लेटस यामुळे हवेत मिसळले जातात. त्यांचे सल्फ्युरिक आणि नैट्रिक ॲसिडमध्ये रूपांतर होते. दोनी आम्ले पाण्याशी संयोग पावून पावसाद्वारे पृथ्वीवर पडतात. यालाच आम्ल प्राजन्य म्हणतात. आम्ल पर्जन्यामुळे झाडे, पाणी, मासे व वनस्पती मरतात.

**...गृह परिणाम : -**

हरितगृह परिणाम प्रक्रिया पृथ्वीच्या पृष्ठभागावरील तापमान वाढीशी निगडीत आहे.

कोळसा खनीज तेलाचे ज्वलन, धूर यामधून कार्बनडाय ऑक्साईड हवेत मिसळला जातो. वायुचे प्रमाण वाढल्यामुळे सूयापासून जमिनीवर पडलेल्या किरणांचे उत्सर्जन कमी होते. आणि भूपृष्ठाचे तापमान वाढत जाते. कार्बनडाय ऑक्साईडच्या थरामुळे सूर्यापासून पृथ्वीच्या पृष्ठभागावर येणा-या

किरणांचे उत्सर्जन अडवले जातृ कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण जस जसे हरित परणाम असे म्हणतात. तापमान वाढीमूळे समुद्रातील पाण्याची पातळी वाढून समुद्रकिनारी वसलेले अनेक देश, शहरे समुद्रात बुडण्याची शक्यता आहे.

**४) ओझोन क्षय : -**

दुसरी महत्वाची समस्या म्ळणजे वातावरणीत ओझेन थराचे विरळ होणे. मानवी जीवनासाठी ओझोन थराचे महत्व मोठे आहे. ओझोन थराचे कार्य हे सरंक्षण ढालीप्रमाणे आहे. सूर्यापासून परावर्तित होणारे हानिकारक किरण ओझोन थरामूळे अडले जातात आणि या -किरणांच्या घातक परिणामांपासून मानवाचे सरंक्षण होते. ही किरणे त्वचेच्या कर्करोगासाठी कारणीभूत आहेत. अलिकडे ओझोनचे थर विरळ होत चालले आहे.

**पर्यावरण संरक्षणशी निगडित महत्वाचे दिवस**

| विश्व पर्यावरण दिन | ५ जून |
|---|---|
| पृथ्वी-वसुंधरा दिन | २२ एप्रिल |
| विश्व वन्य दिन | २१ मार्च |
| विश्व लोकसंख्या दिन | २७ सप्टेंबर |
| विश्व प्रकृति दिन | ०३ ऑक्टोबर |
| विश्व खाद्य दिन | १६ ऑक्टोबर |
| विश्व पशु कल्याण दिन | ०४ ऑक्टोबर |

**निष्कर्ष :** पर्यावरणाच्य घटकांचा महत्वपूर्ण राजकीय शक्ती म्हणून उदय पर्यावरणवादाची आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये महत्वाची भूमिका नैसर्गिक साधनसंपतीच्या प्राप्तीसाठी राष्ट्राध्मये तीव्र स्पर्धा, पाण्याच्या प्रश्नावरून तिसरे महायुध्द होण्याची शक्यता आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांना पर्यावरण प्रदूषणाच्या सामना करावा लागत आहे. पर्यावरण प्रदूषणामुळे वैश्विक तापमानवाढ आम्लपर्जन्य , हरितगृह, ओझोन क्षय इ. परिणाम होत आहे. सन १९८७ साली स्थापन करण्यात आलेल्या ब्रॅंडलॅंड आयोगाने पर्यावरणला

विकासाची कल्पना मांडली. पर्यावरण आणि

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

**संदर्भ : -**

१) समाज प्रवोधन पत्रीका
२) संयुक्त राष्ट्रसंघ शैलें द्र देवळाणकर
३) समाजातील जागतिक राजकारण -शैलेंद्र देवळाणकर
४) पर्यावरणवादी लेख
५) पर्यावरणासंवंधी दैनिक लेखातील माहिती.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad